Golden Research thoughts
Volume 2, Issue. 1, July 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# तुका आकाशाएवढा

मरकड दादा एकनाथ

मराठी विभाग प्रमुख व प्र. प्राचार्य, श्री हरिहरेश्वर कला व विज्ञान महाविद्यालय,
कोरडगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर
Email : dr.dadamarkad@rediffmail.com

***प्रस्तावना :—***

समाजाच्या अंतरंगापर्यंत जावून त्यांच्या बोलिभाषेत वेदांताची नीती शिकवणारी संतांची मांदियाळी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. सामान्य माणसांच्या जीवनात आनंद ओसंडून वहावा, त्यांचे वैयक्तिक आणि सामुदायिक जीवन सुसह्य व्हावे, त्याकरिता आवश्यक ती जीवनमूल्ये समाजात रुजावीत, त्याचबरोबर विषमता, जातियता, अविवेक, विकार आणि विकृती दूर व्हावी व खऱ्या अर्थाने समाजात समता निर्माण व्हावी, समाजमनामध्ये परस्परांबद्दल बंधुभाव निर्माण व्हावा, तसेच विष्णुमय जग पाहण्याची दृष्टी सर्वांना मिळावी या हेतूने, महाराष्ट्रातल्या संतांनी केलेले प्रबोधन महाराष्ट्राच्या विचारप्रवाहाला लोकशिक्षणाची दिशा दिल्याशिवाय राहात नाही. या संत मंडळामध्ये संत तुकारामांचे स्थान उच्च ठिकाणी आहे. "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म| भेदाभेद भ्रम अमंगळ" या उक्तिप्रमाणे संत तुकारामांनी भेदाभेदाला अमंगळ ठरवून विष्णुमय जग पाहण्याची दृष्टी समाजाला दिली. त्यांनी विषमतेच्या वाटा मोडून समतेची पताका खांद्यावर मिरवली. मानवतेच्या विकासाठी पुरातन मार्ग सोडून नवीन वाटेने जाण्याची डोळस दृष्टी दिली.

सामाजिक अध:पतनाने व्याथित झालेल्या जगदगुरुंनी रुढी, ढोंग, दंभ, स्वार्थ, विषमता, अज्ञान त्याचबरोबर माणसांच्या माणूसकीशून्य वर्तनावर ताशेरे आढले. तत्वज्ञान, अध्यात्म ही केवळ विचारप्रणाली नसून ती आचारप्रणाली आहे असे सांगून जीवनवेदांत समाजात रुजवला. त्याचबरोबर त्यांनी अगदी सामान्य संसारी माणसाच्या भूमिकेपासून सुरवात करून महामानवापर्यंतची उंची गाठली. त्यांच्या लौकिक जीवनात अनेक प्रापंचिक संकटे आली. वैभवातून निष्कांचन अवस्थेकडे प्रापंचिक आयुष्य गेले परंतु या सर्व अवस्थेत त्यांनी भगवंताचे चिंतन सोडले नाही. साधन मार्गातल्या अडचणीतून ते स्वत: खंबीरपणे पुढे गेले. स्वत:मध्ये सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ते भागवत धर्म मंदिराचे कळस झाले.

संत तुकाराम हे वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु होते, अग्रणी मार्गदर्शक होते. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रभावळीत स्वत:च्या तेजाने तळपणारे संत अशी तुकोबांची ख्याती आहे. त्यांच्या जीवनकार्यातून त्यांची आर्तता, व्याकूळता, भक्तश्रेष्ठता, आदर्श साधकता, थोर तत्वज्ञता, अभ्यासूपणा इत्यादी विशेष पहावयाला मिळतात. तसेच स्थीतप्रज्ञेचे आचार्य, प्रेमाधिकाराच्या बळावर प्रत्यक्ष पांडुरंगाशी प्रेमकलह मांडणारे, समाजातील आणि उपासनामार्गातील अनीती, भ्रष्टाचार, पाखंड यावर टीकेची झोड उठविणारे, तरीही मवाळ मनाचे, कोमलहृदयाचे, प्रेम आणि दयेची साक्षात मूर्ती असलेले संत तुकाराम त्यांच्या अभंगाच्या रुपाने आपल्यासमोर येतात.

इंद्रायणीकाठच्या देहू या पवित्र क्षेत्रात एका श्रीमंत व पवित्र घराण्यात संत तुकारामांचा जन्म झाला. तुकारामांचे घराणे या देहू गावामध्ये अनेक पिढयापासून राहत होते. त्यांच्या पूर्वीच्या आठव्या पिढीचे पूर्वज विश्वंभरबाबा हे पंढरीच्या पांडुरंगाचे उपासक होते. पंढरीची वारी ते नियमितपणे करीत होते. विठ्ठलभक्तीत रंगलेल्या विश्वंभरबाबांनी स्वप्नदृष्टांताप्रमाणे आंबियाच्या वनात सापडलेल्या श्रीविठ्ठलरुक्मिणीस आपले कुलदैवत मानून देहू क्षेत्रात त्यांचे मंदिर बांधून त्या मंदिरात विठ्ठलरुक्मिणीच्या मूर्तीची स्थापना केली. ही विठ्ठलभक्तीची परंपरा, एकादशीव्रत, प्रतिवर्षी पंढरीची वारी, एकादशीस मंदिरात कीर्तन या परंपरा तुकारामांना पिढीजात प्राप्त झाल्या होत्या. तुकारामांचे घराणे हे पंचक्रोशीत संपन्न घराणे होते. त्या काळात देहू बाजारपेठेचे मोठे गाव होते. तुकारामांचे वडील हे या देहू गावचे जमीनदार-वतनदार होते. परंपरेने महाजनकीचा व्यवहार या घराकडे होता. त्यांची सांपत्तीक स्थिती संपन्न होती. अर्थाजनासाठी वाण्याचा व्यापार होता. त्याचबरोबर त्यांचा सावकारकीचा धंदा होता. याचा अर्थ तुकाराम लौकिक अर्थानेही दरिद्री नव्हते. त्यांचे आईवडील हे सत्प्रवृत्तीचे होते. मोठा भाऊ सावजी विरक्तीकडे झुकलेले होता तर कान्होबा संसारी होता. तुकारामांचे वडील पर्वापार चालत आलेल्या घरातील विठ्ठलाचे धार्मिक उत्सव, कुलधर्म-कुलाचार, कथा-कीर्तने इत्यादी कार्य करीत होते.

तुकारामांचे वडील मोठे सालस आणि उदार अंतकरणाचे होते. त्यांचे आई आणि वडील दोघे विठ्ठलाचे उपासक होते. उभयदांपत्य विठ्ठलाची नुसती उपासना करीत नव्हते, तर त्याप्रमाणे त्यांचे आचार आणि विचारही शुचिश्मंत होते. घाम गाळून केलेली शेती, सचोटीने केलेला व्यापार, महाजनकी आणि नि:स्वार्थ बुध्दीने केलेला

Please cite this Article as : मरकड दादा एकनाथ ,तुका आकाशाएवढा : Golden Research Thoughts (July; 2012)

परोपकार यामुळे तुकारामांच्या घराण्याला चांगलीच प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती . तुकारामाचे बालपण मोठया आनंदात गेले . शेतावर जावे . गुरे राखणाऱ्या पोरांबरोबर दंगा-मस्ती करीत रहावे, नदीच्या पाण्यात डुंबत रहावे, अशा स्वछंद आणि निरागस वातावरणात वयाची बारा वर्षे आनंदात गेली . बालपणी तुकाराम सामान्य मुलासारखे खूप खेळ खेळले . ते आपल्या सवंगडयाबरोबर विटीदांडू, चेंडू, लगोऱ्या, हमामा, हुंबरी, हूतूतू, आटयापाटया इत्यादी खेळ भरपूर खेळले म्हणुनच पुढील आयुष्यात समाजाने केलेले आघात नागबलाने झेलण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले असावे . तुकाराम सवंगडयाबरोबर खेळ खेळत तसे नामदेवादी संतांचे अभंगही मोठया आवडीने म्हणत होते . घरी होणाऱ्या हरी कीर्तनात आणि भजनीफडात लक्ष लावून बसणाऱ्या तुकारामाला कितीतरी अभंग तोंडपाठ झाले होते . अशाप्रकारे रानावनात गाई-म्हशीं चरायला नेणे, निर्सगाच्या सानिध्यात नाना खेळ खेळणे, अभंग मोठया आवडीन म्हणत राहणे, सवंगडयांना एकत्र करून शिदोरी खाणे यामध्ये त्यांचे बालपण गेल्यामुळे त्यांच्या अंत:करणाला एक प्रकारची निरागसता प्राप्त झाली होती .

बालपणापासून तुकारामांच्या मनावर विठ्ठलनामाचे संस्कार झाले होते आणि खोलवर रुजलेले होते . भागवत ग्रंथाचाही संस्कार त्यांच्या काहीशा अंतर्मुख मनावर होणे स्वाभाविक होते . बालपणी झालेल्या या धार्मिक संस्कारामुळे पुढे त्यांच्या आयुष्याला विलक्षण वळण प्राप्त झाले . त्यांनी रात्रंदिन युध्दाचा प्रसंग अनुभवून आपण विठ्ठलाचे गाढे उपासक असल्याचे सिध्द केले, विठ्ठल हे त्यांचे जिवीत सर्वस्व बनले होते, बळकट असे श्रध्दास्थान बनले . त्यामुळे लौकिक जीवनात राहूनही आपल्या चित्तवृत्ती मलिन न होऊ देण्याची किमया त्यांना विवाहपूर्व जीवनातच झालेल्या संस्कारांमुळे प्राप्त झालेली होती . त्या काळात बारा-चौदा वर्षाचा मुलगा असतानाच त्याचा विवाह करण्याची पध्दत होती . त्यामुळे तुकारामांच्या आईवडीलांनी बाराव्या वर्षीच आपल्या लाडक्या मुलाचा तुकोबाचा विवाह घडवून आणला होता . त्यांच्या पत्नीचे नाव रखुमाबाई होते . त्याआधीच सावजीचा विवाह उरकलेला होता . परंतु सावजीचे चित्त संसारात लागत नव्हते . त्यांची ओढ तीर्थयात्रेकडे लागलेली होती . त्यामुळे आईवडिलांच्या साऱ्या आशा तुकारामात गुंतलेल्या होत्या . आपल्या पश्चात तुकोबा आणि त्यांची पत्नी मिळुन संसाराचा गाडा शिताफीने ओढतील अशी त्यांची आशा होती . परंतु त्यांच्या पदरी निराशाच पडली . तुकारामांच्या पत्नीला दम्याचा विकार आहे असे लवकरच लक्षात आले . ही दमेकरी पोर इतक्या माणसांचा, आल्यागेल्यांचा प्रपंच कसा सावरू धरणार ? असा विचार करून पुण्याजवळील खेड या गावच्या आप्पाजी गुळवे या धनिक सावकाराच्या मुलीशी तुकारामाचे दुसरे लग्न लावून दिले तिचे माहेरचे नाव जिजा होते . संत तुकारामाचा संसार सुरू झाला होता . गृहस्थाश्रमाच्या ओझ्याबरोबरच व्यवहाराचा, व्यापारउदीमाचा भारही कळत नकळत तुकारामावर टाकला गेला . त्यांनीही तितक्याच तत्परतेने लोकव्यवहाराचे भान ठेवीत व्यापारपेठेत आपला जम बसविला, प्रतिष्ठा मिळवली . जरी तुकाराम वयाने लहान असले तरी महाजनकीच्या अधिकारामुळे व त्यांच्या मुद्देसुद न्यायनिवाडयामुळे, तंटा मिटवण्याच्या अधिकारी अनुभवामुळे वयोवृध्द व मोठमोठे व्यापारी देखील त्यांच्याकडे सल्ला मसलत करण्यासाठी आपल्या समस्या घेऊन येत होते .

दृष्ट लागावी असा तुकारामांचा प्रपंच चालला होता . सुबत्तेला परमार्थाची जोड मिळाल्याने त्याला एक प्रकारची आगळी शुचिता प्राप्त झाली होती परंतु नियती ही अशी एक अज्ञात आणि गूढ शक्ती आहे की जी काही लोकांना सरळपणे जगूच देत नाही . विशेष जो सोशिक आहे, ध्येयवादी आहे, काही जीवनमूल्ये घेऊन जगणारा आहे, धिरोदात्त आहे, स्वाभिमानी आहे, नीतिशास्त्राची चाड बाळगणारा आहे, अशा उमद्या माणसांच्या जीवनात क्रूर खेळ खेळण्याची लहर तिला येते . या नियतीची एक विध्वंसक लाट तुकारामांच्या जीवनात आली आणि त्यामुळे त्यांच्या आयुष्याची सारी घडीच विस्कटून गेली . वयाच्या सतराव्या वर्षीच त्यांच्या माता पित्यांचे निधन झाले . वडील भाऊ सावजीची पत्नी निर्वतली . त्यानंतर सावजी तीर्थयात्रेला निघून गेला . तुकाराम धिरोदात्त असले तरी आतून मनाने हळवे होते . आतल्या आत त्यांनी हे आघात कुणालाही समजू न देता सहन केले . याच काळात महाराष्टात भयानक दुष्काळ पडला . गुरेढोरे उपाशी मरू लागली . त्यातून रोगराईने कहर मांडला . तुकारामांच्या कुटुंबात एका पाठोपाठ एकेकाचा बळी जाऊ लागल्याचे भयानक दृष्य त्यांना उघडया डोळयाने पाहावे लागले . तुकारामांना या आपत्तीचा जबरदस्त तडाखा बसला . व्यापार बुडाला . आपल्या जवळ होते ते सर्व त्यांनी आपल्या उदारवृत्तीने उपाशी मरू पाहणाऱ्यांना दिले . उरले सुरले आपल्या स्वत:च्या संसाराला पुरवता पुरवता संपून गेले . कोणी देणी देईनात . उलट तुकारामावरच लोकांची देणी द्यायची वेळ आली . एकेकाळचा सावकार, दुकानदार, लोकांच्या गरजा मवाळ मनाने भागवणारा पण त्याच तुकारामावर लोकांच्या दारात जायची पाळी आली . त्यामुळे लोक त्यांना टोचून बोलू लागले . जे लोक उत्तम प्रपंच आणि व्यापार उदीम करणाऱ्या तुकारामाची स्तुती तोंड भरून करत होते . तेच लोक आता त्यांच्यावर आलेल्या या विपत्तीत त्यांची निंदा-नालस्ती करण्यात धन्यता मानू लागले . त्यामुळे संत तुकारामाचे मन विरक्तीकडे जास्तच झुकू लागले .

संत तुकारामांनी मराठी भाषेत अभंगाच्या स्वरुपात वेदार्थ प्रकट केला . मराठी सारस्वतात तुकोबांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वात वरचे असून ती सामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडली आहे . वेदांतील गीर्वाण भाषेतील शब्द तुकारामांच्या वाणीतून सहज उमटले आहेत . वेदांतातील कर्म, उपासना, ज्ञान, उपनिषदातील तत्त्वबोध, प्रमेय, शास्त्रातील सिध्दांत, पुराणातील देवांचे अवतारकार्य या गोष्टी त्यांनी अभंगाच्या रुपाने समाजासमोर मांडल्या . त्यांच्या अभंगगाथेत वेदातील तत्त्वांचाच अत्यंत सुंदर शब्दात आविष्कार झाला आहे . वेदांतातील सिध्दांत त्यांनी आपल्या भाषेत व लोकांना कळेल अशा पध्दतीने मांडला . तुकोबांच्या साधक दशेतील अभंग म्हणजे 'अंतर्बाह्य जग आणि मन' रात्रंदिन चालू असलेल्या त्यांच्या मानसिक युध्दाचा आलेख आहे . त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांची वाङ्मयीन मूर्तीच आहे . त्यांची अभंगवाणी भक्तिप्रेम रसामृताने परिपूर्ण भरलेली, सत्यनिष्ठा, प्रसन्न, सूत्ररूप, सारगर्भित असूनही नि:संदिग्ध, मानवी अंतकरणास पित्याप्रमाणे कर्तव्यपरायण ठेवणारी व मातेप्रमाणे वात्सल्याने सत्प्रवृत्त करणारी व संतांच्या अनुग्रहाने पांडुरंगाप्रत घेऊन जाणारी असल्यामुळे महाराष्ट्रात ती अनन्यसाधारण लोकप्रिय झाली . विवेकासहित वैराग्याचे बळ संपादन करून प्रज्वलीत केलेल्या अग्नीज्वाळावर तुकारामांनी भक्तीभाग्याची परमसीमा गाठून ब्रह्मबोधांच्या पाकसिध्दीचा पुरूषार्थ प्राप्त केला . जीवन्मुक्तांना आत्मस्थिती सोडावयास लावले . तपोनिधींना अभिमान सोडायला लावला, यज्ञ आणि दान करणाऱ्यांना लाजविले . अर्थात साक्षात्कारानंतरच्या ज्ञानोत्तर प्रेमभक्तीपर्यंतचे शिखर त्यांनी गाठले . त्यामुळेच वारकरी संप्रदायात 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हटले जाते .

तुकारामांच्या आयुष्याला परमात्मरुप होण्याचे, अद्वैताच्या प्राप्तीचे ध्येय प्राप्त झाले होते . त्यासाठी ते सर्वस्वावर पाणी सोडून वाटचालही करू लागले होते . त्यांची इच्छाशक्ती प्रबळ होती, विवेकाचे बळ पाठीशी होते आणि आचारशुध्दीवरील विश्वासही दुणावला होता . परंतु परमार्थात साधकाच्या मार्गातील सारे हीण नाहीसे करून प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या, प्रसंगी मातेच्या ममतेने धीर देणाऱ्या सदगुरूसारख्या वाटाडयाची नितांत आवश्यकता होती . 'गुरूवीण विद्या कैची' हे तुकोबांना माहीत होते . पण त्यांना सदगुरू भेटत नव्हता . एक दिवस रात्री झोपेमध्ये असताना 'रामकृष्णहरि' मंत्राचा त्यांना दृष्टांत झाला . त्यांना राघवचैतन्याचा शिष्य बाबाचैतन्य यांनी गुरूमंत्राची दीक्षा दिली . झोपेतून जागे झाल्यावर तुकाराम 'रामकृष्णहरि' असे म्हणून बेभान होऊन नाचू लागले . शेवटी शांत झाल्यावर त्यांच्या डोळयातून पाणी वाहू लागले . गुरूमंत्राची दीक्षा मिळाल्यानंतर वर्षभरातच तुकाराम पूर्णपणे बदलले . ते आनंदी, सतेज, उत्साही दिसू लागले .

संत तुकारामांनी देहू गावामध्ये विठोबाचे देवालय उभे केले ते आपल्या प्रतिष्ठेसाठी नव्हे . समाजमध्ये भक्तीभाव निर्माण व्हावा समाजाला चांगल्या विचाराची दिशा मिळावी . आपल्या श्रध्दास्थानाची पूजाआर्चा व्हावी असे अनेक उद्देश त्यामागे होते . त्याचबरोबर संत तुकाराम मानसन्मानाच्या पलीकडे गेलेले होते . त्यामुळे तुकोबा हरिकीर्तनात रंगून गेले . संसार सांभाळून बाकीचा सर्व वेळ ते नामस्मरणात आणि हरिकीर्तनात घालत होते . सुरवातीला लोकलाज, लोकभय आणि कीर्तनासाठी आवश्यक असलेल्या बहुश्रुततेचा अभाव म्हणून त्यांचे मन काहीसे दडपले गेले असल्यास नवल नव्हते . पण आपले दिवाळे निघाल्याची आणि बायको अन्न करीत मेल्याची लोकलाज ज्या खंबीर मनाने पूर्वी त्यानी झुगारून दिली होती, त्याच खंबीर मनाने त्यांनी लोकासमोर कीर्तनासाठी उभे राहताना वाटणारी लाज झुगारून दिली . कीर्तन करून आपल्याला परमार्थ सांगतो म्हणून ज्यांचा अहंकार दुखावला जाणे शक्य असते . अशा लोकांचे भय झुगारून देणे त्यांना फारसे जड गेले नाही . प्रवाहाच्या विरुध्द दिशेने पोहत जाण्याचे साहस त्यांच्या अंगवळणी पडलेले होते . त्यातुळे लोक निंदेकडे दुर्लक्ष करत त्यांनी आपले कीर्तनकार्य सुरू ठेवले . तुकाराम अनेक कीर्तनकारांची कीर्तने आवर्जून ऐकत होते . तुकारामांचे पहिले कीर्तन अतिशय सुंदर झाले . कृष्णाच्या बाललीला त्यांनी सांगितल्या सुरवातीला अभ्यासात लक्ष लागत नाही म्हणून ते नाराज असायचे . कीर्तन सुरू असताना तुकाराम कीर्तनामध्ये खूप दंग व्हायचे . त्यांना श्रोत्यांचे सुध्दा भान राहत नव्हते . ईश्वरभक्तीमध्ये पूर्णपणे तल्लिन होणारा महात्मा म्हणून आपण संत तुकारामांकडे पाहू शकतो . स्वत:च्या कुटुंबाची वाताहत झालेली असतानाही तुकाराम कीर्तन असलेल्या घरी अन्नाचा कनही घेत नव्हते म्हणूनच ते महामानव

ठरतात . सदाचार व वैराग्य या कसोटयावर जो उतरतो तो खरा खरा संत ठरतो . सदाचारात, नीती, परमशांती, सहनशीलता इत्यादींचा सदगुणांमध्ये समावेश होतो . आत आणि बाहेर स्वच्छ वैराग्य, धन व स्त्री यावर पूर्ण विजय या गोष्टीच्या स्वीकारनंतर त्याला संतत्व प्राप्त होते . संतासाठी आवश्यक सर्व गुण तुकारामांच्या ठिकाणी होते म्हणून आजही समाजाला त्यांच्या विचाराची गरज आहे .

संत तुकारामांच्या जीवनात अवघड व कसोटीचे प्रसंग आले . प्रत्येक कसोटीत त्यांच्या वैराग्याचे तेज हिऱ्याप्रमाणे झळकले त्या तेजाने जग दिपून गेले . त्यामुळेच ते जगदगुरू ठरले . जगन्मान्य, असामान्य, अद्वितीय असे हे संत श्रेष्ठ तुकाराम शांतता मिळावी यासाठी गावाजवळच्या भामनाथाच्या डोंगरावर जाऊन बसू लागले . शांत, निरव निसर्गाच्या सानिध्यात त्यांचे मन रमू लागले . डोंगर, नदी, नाले, निळेभोर आकाश, ग्रहतारे, सूर्य, चंद्र, चर आणि अचर यांच्या मागे काय दडलेले आहे ? हे विश्व कसे चालते ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न त्यांचे मन करू लागले . आपल्या जीवनातील वास्तव काय असावे ? त्याचा या विश्वाशी काय संबंध असावा ? या विश्वातील प्राणी मात्रांचा व आपला काय संबंध आहे तसेच हे विश्व नियंत्रित करणाऱ्या शक्तीचा आपल्याशी काय संबंध असावा अशा अनेक विषयाचा गहन विचार त्यांचे मन करू लागले . पूर्ण विचारांती परमात्मा हेच अंतिम सत्य आहे या विचाराप्रत ते आले . आपत्तीकडे सकारात्मक दृष्टीने पाहून त्यांनी परमेश्वराचे आभार मानले . त्यांचे जीवन वैराग्याने तापलेले, भक्तीने द्रवलेले, ज्ञानाने उजाळलेले होते . त्यामुळेच ते भंगवंताला धारण करू शकले . त्यांनी आपल्या जीवनकार्याच्या रुपाने सत्संग, सदाचार आणि संयम या त्रिवेणी संगमातून स्वानंदाचे तरंग उठतात हे त्यांनी दाखवून दिले .

संत तुकारामांना मानवांच्या बेफीकीर वृत्ती बद्दल नवल वाटते . ते वैराग्यपूर्ण पध्दतीने जगले . लौकिक जीवनात राहूनही अलौकिक जीवन जगले त्यामुळेच ते समाजासमोर एक मोठा आदर्श निर्माण करू शकले त्यांच्या संपूर्ण जीवनाचा संघर्ष पाहिल्यानंतर त्यांना आपण महानायक म्हणू शकतो . अखंड हरिनामाचा शब्दोच्चार करून संपूर्ण मानव जातीला त्यांनी जीवनाचे आध्यात्मिक दर्शन घडविले . अशा संत सज्जनाने आपले जीवनवास्तव रुपात व निसर्गाच्या सानिध्यात जगण्यात धन्यता मानली . माणसांनी माणसाप्रमाणे वागावे, बोलावे, चालावे हे तुकारामांच्या जीवनावरून आपल्याला कळते . त्यांचे निसर्गसृष्टी व सजीवसृष्टी दोहोवर सारखेच प्रेम होते . मनाच्या वासनेला लगाम घालून त्यांनी परमार्थाची विजयी पताका सदैव फडकत ठेवली . हरिनामाचा उच्चार हा एकच ध्यास त्याच्या मनात होता . जमिनीत पेरलेले बी-बियाणे सुध्दा अभंगाच्या अक्षरांनी उगावेत असे तुकारामांचे शब्द होते . पाने, फुले यांचा जिव्हाळयाचा अटूत संबंध त्यांनी जोपासला होता . तुकारामांच्या रोमारोमात भक्तीप्रेम, हरिनाम होते . त्यांनी आपल्या वाणीवर प्रभुत्व मिळवून ज्ञानसंपदेचे ग्रहन केलेले होते . तुकोबांचा पिंड जसा भावनाप्रधान भक्ताचा होतो, तसा परखड समाजसुधारकाचा ही होता . त्यांचे व्यक्तिमत्व दुधारी होते . 'बुडती हे जन न देखवे डोळा' अशा कळवळया पोटी त्यांनी समाजाला उध्दाराचा मार्ग दाखविला . बहुजनांच्या धर्मश्रध्देला 'तत्वचिंतन आणि चित्तशुध्दीची' जोड दिली .

महापुरूषांची तळमळ ही जनसामान्यांच्या सुख दु:खात सामावलेली असते . अशा प्रकारची तळमळ संत तुकारामांच्या जीवनात होती . त्यांच्या जवळ मनाची एकरूपता, मनाचा मोठेपणा होता म्हणूनच वर्णभेद, जातीद्वेष ओलांडून तुकारामांनी आपल्या जीवनाची वाटचाल वैष्णवांच्या यश-शिखराच्या कळसाला जाऊन भिडवली . वैष्णवांच्या यशशिखराचे परमभाग्य लाभलेले तुकाराम जनसामान्यांना जिव्हाळयाचे वाटतात . त्यांनी माणसा माणसात असणारा परमेश्वर ओळखला होता . रंजले, गांजले, पिडित अशाच लोकांना त्यांनी आश्रय दिला . त्याच पिडितांना त्यांनी देव मानले . जीवन जगताना, दु:खाच्या डोंगरावर सुखाचा कळस त्यांनी बांधला,

तुकाराम हे नाव स्वीकारून देहू सारख्या छोटया खेडयातून त्या काळात त्यांच्या वाटयाला आलेले जीवन जगणे सहज सोपे नव्हते तरी सुध्दा आपल्या बालपणापासून ते जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत त्यांनी संघर्ष केला . असंख्य दु:खाशी सुखाचा धागा पकडून जीवन जगण्यात त्यांनी धन्यता मानली . मात्र ही धन्यता सुख-दु:खाचा सामना खेळत होती . हा जीवन सामना चालू असताना एका बाजूला परमेश्वराचा, ध्यास, चिंतन आणि दुसऱ्या बाजूला समाजाचा प्रचंड विरोध याला प्रत्यक्षपणे त्यांना सामोरे जावे लागले . या कार्यात तुकारामांच्या देहाचे भरपूर हाल झाले . प्रसंगी उपवास, कष्ट, अन्नत्याग करूनही परमेश्वराचा श्वास, चिंतन यातून नामाची ध्येयपूर्ती केली . हे वास्तववादी जीवन सामान्यांच्या काळजाला स्पर्श केल्याशिवाय राहत नाही . संत तुकारामांनी नामाचा गजर करीत मानवजातीला मानवधर्माची ओळख करून देण्यात जीवन घालविले . म्हणूनच 'तुका आकाशाएवढा' असे म्हटले जाते .

**संदर्भ ग्रंथ**


1 . श्रीकांत गोवंडे, श्रीपांडूरंग महात्म्य कथासार

2 . ल . रा . नशिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

3 . डॉ . गोपाळराव गोविंद बेणारे (संपा), सार्थ तुकाराम गाथा

4 . सु . ह . जोशी, संतांच्या गोष्टी

5 . श्री मोळक, जगदगुरू श्री संत तुकाराम

6 . गं . बा . सरदार, (सं) तुकाराम दर्शन

7 . वि . भि . कोलते, प्राचीन मराठी साहित्य, संशोधन

8 . र . रा . गोसावी, सौ . विणा गोसावी, श्रीतुकारामचरित्र

9 . गं . भा . सरदार, संत साहित्याची सामाजिक फलश्रुती